# प्रकरण - ७

# प्रेक्षणीय स्थळे

अनुक्रमणिका

# अनुक्रमणिका

**प्रकरण ७ प्रेक्षणीय स्थळे** ........ ३

प्रवरा खोऱ्यातील किल्ले ........ १६

# प्रकरण ७ प्रेक्षणीय स्थळे

**अकोले** (ता. अकोले, १८०.०० 'उ., ७५०.१०' पू.) -

अकोले हे तालुका मुख्यालय असून अहमदनगरच्या वायव्येस ६ कि.मी. अंतरावर आहे. २००१ च्या जनगणनेनुसार येथील लोकसंख्या २,६६,६२८ एवढी आहे. प्रवरा खोऱ्यात येणाऱ्या या स्थानाला पौराणिक वारसा लाभला असून येथे असलेल्या वैशिष्ट्यपूर्ण वास्तूंमध्ये खालील नोंदी घ्याव्या लागतील.

**सिद्धेश्वर मंदिर :** हे मंदिर हेमाडपंथी पद्धतीने बांधलेले आहे. म्हणजे शुष्कसंधी प्रकारात मोडणारे आहे. सन १७८० पर्यंत हे प्रवरा नदीच्या गाळात गाडले गेले होते. एका कुणब्याचा नांगर लागून मंदिराचा काही भाग स्पष्ट झाल्यामुळे ग्रामस्थांनी या भागात उत्खनन करून संपूर्ण मंदिर खुले केले. गाळात दबलेले हे मंदिर शिवमंदिर म्हणून ओळखले जात असले तरी या मंदिरावरील समुद्रमंथनविषयक शिल्प व विष्णूच्या विविध अवतारातील मूर्तीशिल्पांचा विचार करता हे मूळ विष्णू मंदिर असावे अशी अभ्यासकांची धारणा आहे. मंदिरातील एका स्तंभावर संस्कृत भाषा व देवनागरी लिपीतील शिलालेख आहे. तो झिजला असल्यामुळे अद्याप अप्रकाशित आहे. मूळ मंदिर क्षतिग्रस्त झाले असले तरी ते साधारण तेराव्या शतकाच्या उत्तरार्धातील असावे.

**गंगाधर मंदिर :** हे मंदिर कृष्णाजी अंबादास संत यांनी सन १७८२ साली बांधले. मंदिर शहराच्या मध्यभागी असून उत्तर मध्ययुगीन कालखंडातील एक उत्कृष्ट मंदिर आहे. अकोले गावामध्ये प्रवरेच्या काठावर साधारणत: १७, १८ व्या शतकातील अनेक जुने वाडे अवशेष स्वरूपात आपले अस्तित्व टिकवून आहेत. साधारणत: ब्राम्हण व मराठा समाजातील व्यक्तींचे हे वाडे असावेत.

**कोथूळ मुकुंजी** (ता. अकोले, १८० ४५ 'उ., ७४० ४०' पू.)-

हे अकोलेपासून २५ कि.मी. अंतरावर नैऋत्येस असून येथे नारायणेश्वर मंदिर भग्नावशेषाच्या स्वरूपात उभे आहे. यामध्ये मंदिराच्या प्रवेशद्वाराचाही समावेश आहे. याशिवाय अन्य एका वास्तूचे अवशेष येथे पहावयास मिळतात. ते कोटेश्वर मंदिराचे असल्याचे मानले जाते.

**कोल्हार** (ता. रहाता, १९० १५ 'उ., ७५० ४५' पू.)-

राहाता तालुक्यातील कोल्हार हे एक मोठे व महत्त्वाचे व्यापारी केंद्र आहे. येथील भगवती माता मंदिरामुळे या ठिकाणाला कोल्हार भगवतीपूर असे म्हटले जाते. येथे प्रतीवर्षी चैत्र शु. १५ला (जानेवारी महिन्यात) पंधरा दिवसांसाठी भगवती देवीची यात्रा भरते.

**टाहाकारी** (ता. अकोले, १९० ३६ 'उ., ७३० ५५' पू.)-

अकोले शहराच्या वायव्येस १५ कि.मी. अंतरावर टाहाकारी हे गाव आहे. या गावातील भवानी मंदिर त्रिदल पध्दतीचे असून ते त्याच्या तलविन्यासामुळे आणि एकेकाळी त्यावर असलेल्या शिखरामुळे

अनुक्रमणिका

उल्लेखनीय आहे. या मंदिराच्या तिन्ही गर्भगृहांवर विटांची शिखरे होती. गेल्याशतकात हेन्री कझिन्सने जेव्हा या मंदिराची पाहणी केली तेव्हाच ही शिखरे कमालीच्या दुरावस्थेत होती.

कझिन्सने त्याच्या पुस्तकात प्रसिध्द केलेल्या चित्रावरून या मंदिराचा तलविन्यास सप्तरथ असून ते सप्तभूम भूमिजप्रासाद असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. म्हणूनच या मंदिरावरील शिखरे आज नष्ट झालेली असली तरीही या मंदिराचे विवरण या भागात करण्यात येत आहे. हे मंदिर पश्चिमाभिमुख असून मुखमंडप, त्यामागे दोन बाजूस प्रत्येकी एक अंतरालयुक्त उपगर्भगृह असलेला मंडप, त्यामागे अंतराल व मुख्य गर्भगृह असा या मंदिराचा तलविन्यास आहे. उपगर्भगृहांची अंतराले मुख्य गर्भगृहापेक्षा लहान आहेत. मुखमंडपाला वामनभिंत (पारट) असून त्यावर प्रत्येक बाजूस पाच वामनस्तंभ आहेत. या वामन स्तंभाव्यतिरिक्त पुढे दोन आणि मागे दोन असे एकूण चार स्तंभ आहेत. अशा स्तंभांवर मंडपाचे वर्तुळाकार (करोटक पध्दतीचे) छत पेललेले आहे. मुखमंडपामागे मंडप असून त्यात चार कोपऱ्यात चार व यातील प्रत्येक स्तंभांशी काटकोनात पण चतुष्कीच्या बाह्य भागात प्रत्येकी दोन स्तंभ आहेत. मंडप बारा स्तंभांनी पेललेला आहे. मंडपावर कमानींची कलाकुसर असलेले अलंकृत करोटक पध्दतीचे छत आहे. या छताच्या उत्तरोत्तर लहान होत जाणाऱ्या वर्तुळाकार भागांमध्ये ठराविक अंतरावर तिरप्या सपाट पृष्ठभागावर (struts) किंवा फलकांवर नर्तकांच्या आणि वादकांच्या मूर्ती आहेत. छताच्या मध्यातून कमलाकृती नक्षीचा दगडी भाग खाली आला आहे. हा भाग त्याचप्रमाणे लघुमंदिरांचा कोरीव पट्ट, कीर्तिमुख, रुपकंठ, गजतालू यासारखी प्रयोजने पश्चिम भारतीय सोळंकी शैलीशी साधर्म्य दाखवितात. चार स्तंभ आणि दोन अर्धस्तंभांच्या पलिकडे अंतराळ आहे. अंतराळाला आयताकृती छत असून त्यात मधोमध छोटा घुमट आहे. अंतराळाच्या मागे चौरसाकृती गर्भगृह असून त्यात मागील बाजूस मूर्तीकरिता पीठ आहे. दोन उपगर्भगृहांमध्येही अशीच पिठे आहेत.

मंदिराचा अंतर्भाग अलंकरणाने समृध्द असला तरी मंदिराचे बाह्यांग मात्र साधे आहे. खाली मध्यम आकाराचे पीठ असून त्यावर साधी सपाट जंघा आहे. पिठामध्ये तीन थर आहेत. सर्वात वरच्या थरावर चौकटची नक्षी आहे. त्यावर कपोताली, कलश आणि मंची आहे. मंडोवराच्या खालच्या थरानंतर साध्या सपाट (याला शिल्प संहितांमध्ये 'शुध्द जंघा' असे संबोधिले आहे) जंघाभागाला प्रारंभ होतो. जंघाभागावर नक्षीकाम नसले तरी गर्भगृहाच्या तीन भद्रांवर तीन देवकोष्ठे असून त्यात मूर्ती आहेत. सलिलांतरावरील जंघाभागात अप्सरांच्या मूर्ती आहेत. फक्त मंडपाच्या बाजूंना असलेल्या दोन गर्भगृहांच्या आणि अंतराळाच्या बाह्यांगावरच मंजरी आढळतात, ज्या अन्यत्र आढळत नाही.

मंडपाच्या मुख्य स्तंभांवर चारी बाजूंवर आणि ठराविक पातळीवर असणाऱ्या पट्ट्यांवर आकृतिशिल्पे आहेत. स्तंभावर कीचकहस्त आहेत. याउलट अर्धस्तंभ आणि चतुर्थस्तंभ तुलनेने साधे असून त्यावर कोणतीही आकृतिशिल्पे नाहीत. या स्तंभांवर नागशीर्षहस्त आहेत.

भद्रांवरील देवकोष्ठात असलेली मूर्ती, मंडोवरावर मोठ्या प्रमाणात आढळणाऱ्या स्त्रीमूर्ती, तिन्ही गर्भगृहांमध्ये आढळणारे पदस्थल आणि परंपरेने चालत आलेले 'भवानी मंदिर' हे नाव, इत्यादी बाबींवरून हे देवीचे मंदिर होते हे नि:संदिग्धपणे लक्षात येते. या तीन गर्भगृहांमध्ये महालक्ष्मी, महाकाली आणि महासरस्वतीच्या मूर्ती असाव्यात. कोल्हापूरच्या महालक्ष्मीचा संप्रदाय त्या काळात चांगलाच फोफावला होता आणि टाहाकारी हे या संप्रदायाचे त्या भागातील केंद्र असावे असे दिसते.

अनुक्रमणिका

छतावरील आणि मुख्य मंडपातील शिल्पकला, स्तंभप्रकार आणि मंडपाच्या बाजूच्या गर्भगृहांची असलेली द्राविडी जंघा आणि शिल्पशैली ही वैशिष्ट्ये लक्षात घेता हे मंदिर इ.स. च्या बाराव्या शतकाच्या सुरुवातीला बांधले गेले असावे.[१]

**टोके** [कायगाव-टोके ही दोन स्वतंत्र गावे आहेत. त्यांच्या पौराणिक कथानकांची चर्चा श्रीमती अरुणा ढेरे यांनी या ग्रंथांच्या अन्य प्रकरणात केली आहे. येथे अधिक नोंद देत आहोत.] (ता. नेवासा, १९० ५० ‘उ., ७५० ०५ ' पू.) -

नेवासापासून ११ कि.मी. अंतरावर ईशान्येस असलेले टोके हे १.३ चौ.मैल जागेवर वसलेले आहे. कायगाव-टोके गावाच्या उत्तरेला गोदावरी आणि पूर्वेला प्रवरा अशा नद्या आहेत. त्या येथे जवळपास काटकोनात एकमेकांस मिळतात. या काटकोनावर टोकेगाव आहे. प्रवरेच्या पूर्व किनाऱ्यावर प्रवरा संगम आणि गोदावरीच्या उत्तरेच्या काठावर कायगाव टोके असा जोड उल्लेख येतो. टोके गावाच्या उत्तर व पूर्व सीमा म्हणजे या दोन नद्या. त्यांच्या काठावर जवळपास एक किलोमीटर लांब असे प्रशस्त घाट बांधले आहेत. घाटांच्या वरच्या बाजूस भक्कम दगडी बांधकामाच्या कमानदार ओवऱ्या असून, पुराच्या पाण्याचा जोर कमी करण्यासाठी मध्ये-मध्ये बुरूज बांधलेले आहेत. गोदावरीच्या बाजूला जवळपास ईशान्य कोपऱ्यावर कमानदार असे नगराचे प्रवेशद्वार आहे. घाटांच्या वरच्या बाजूंना त्यांना समांतर असे रस्ते ठेवण्यात आले असून रस्त्यांच्या पलीकडे असणाऱ्या जागेत वाडे होते. या वस्तीच्या जवळजवळ मध्यभागी सिध्देश्वर महादेवाचे मंदिर आहे. त्याच्या चारही बाजूंनी तीन मीटर रुंदीचे रस्ते होते, जे फरसबंद करण्यात आलेले होते. या रस्त्यांना समांतर असे रस्ते थोड्या-थोड्या अंतरावर असून त्यामुळे निर्माण झालेल्या चौकात वाडे बांधण्यात आले. गद्रे नावाच्या सावकारांनी सिध्देश्वर मंदिर बांधले. त्यांचा येथे वाडा होता. नाना फडणीसांचाही वाडा होता आणि उत्तर पेशवाईतील अनेक महत्त्वाच्या व्यक्तींनी येथे वाडे बांधले होते. या रम्य ठिकाणाचा उपयोग मुख्यत: विसाव्यासाठी होत असे. टोक्याचे बहुतेक सर्व बांधकाम सन १७६० नंतरचे आहे. वर म्हटल्याप्रमाणे नद्यांच्या पाण्याने (पुराने) ते बरेचसे आता गिळंकृत केले आहे.

सन १७५० नंतर रघुनाथराव पेशव्यांनी कोपरगाव येथे वाडा बांधला. याच काळात नाशिकचा सरकारवाडा बांधला गेला.

पेशवेकाळामध्ये काही गावे तथा नगरे नव्याने वसविण्यात आली तर, काहींची पुनर्रचना करून त्यांची वाढ करण्यात आली. आज यापैकी कुठलेही स्थळ पूर्वावस्थेत पहावयाला मिळत नाही. टोके हे उल्लेखनीय स्थान आहे. गावाचा आकार मोठा नसला तरी तेथे अनेक वास्तूप्रकार आणि त्यांची योजनापूर्वक मांडणी केलेली होती. या संदर्भात व अन्य स्थानांसंदर्भात पेशवेकाळात झालेला पत्रव्यवहार व बखरीतील नोंदी यामध्ये आलेले वर्णन महत्त्वाचे ठरते.

शक्यतो सरळ एकमेकांना काटकोनात असणारे रस्ते आणि तेही चार दिशेने तोंड करूनच आखणे हे प्राचीन नगर रचनेचे वैशिष्ट्य टोका येथे पाळले गेले. रस्ते अरुंद असले तरी दगडांनी आच्छादलेली फरसबंदी आहे. गोदावरीच्या तिराने जवळपास ८८० फूट (२६८ मी.) लांब आणि त्याच काटकोनात प्रवरेच्या तिराने ८५० फूट (२५९ मी.) लांब असे दोन विस्तीर्ण घाट गावाची उत्तर व पूर्वसीमा आखतात. घाटाच्या वरच्या बाजूला कमानदार ओवऱ्या बांधलेल्या असून तीच गावाची हद्द आहे. घाटात मधोमध मोठे बुरूज बांधून पुराचे वेळी पाण्याची गती रोखण्याची व घाट सुरक्षित राखण्याची योजना केली आहे. गावाच्या

मध्यभागी सिध्देश्वर हे महादेवाचे सुरेख मंदिर आहे. मंदिराच्या आवाराच्या चारही बाजूने रस्ते आहेत व त्यापलीकडे तसेच आयत आखून त्यात घरे बांधली आहेत.[२]

मराठाकालीन मंदिरांच्या प्रकारामध्ये यादव किंवा हेमाडपंथी असा एक गट आहे. याला महाराष्ट्री असे नाव देता येते. दुसरा गट नागर मंदिरांचा आहे. माळव्यात प्रचलित असणाऱ्या हिंदुस्थानी किंवा नागर शैलीतील मंदिरे संख्येने कमी आहेत. तिसरा गट मराठेशाही मंदिरांचा आहे. यामध्ये माळवा, आग्रा अशा ठिकाणच्या वास्तूमधील काही घटक एकत्र केले गेले आहेत. साधारण १७७५ च्या सुमारास हा प्रकार रुढ झाला. चौथ्या प्रकारामध्ये संकीर्ण स्वरूपाची मंदिरे आहेत.

दुसऱ्या गटात मोडणारी हिंदुस्थानी किंवा नागर मंदिरे यामध्ये नाशिकचे काळाराम मंदिर, त्र्यंबकेश्वरचे शिवमंदिर, गोदा-प्रवरा संगमावर कायगाव व टोके या दोन्ही ठिकाणची शिवमंदिरे, नेवासे येथील मोहिनीराज मंदिर ही मंदिरे 'देवालये' या प्रकारातील आहेत. यांचे वैशिष्ट्य असे की, या सर्वांचे बांधकाम इ.स. १७६० च्या नंतरचे आहे. ही मंदिरे बांधणाऱ्यांचा संपर्क इंदूर-ग्वाल्हेर दरबाराशी (माळव्याशी) किंवा खुद्द दिल्लीशी होता. त्यांनी कर्तृत्वाने संपादन केलेल्या जहागिरीत किंवा मूळ गावात नव्याने परिचित झालेल्या मुलुखातील मंदिरशैली उपयोगात आणली. त्यासाठी कदाचित त्या प्रदेशातील कारागीरही महाराष्ट्रात आणले असावेत.[३]

अशी मंदिरे पूर्णपणे दगडी बांधणीची असून दगड भरीव गुळगुळीत आहे. बांधकाम सफाईदार आहे. मंदिराचा तलविन्यास यादव मंदिरापेक्षा थोडा वेगळा आहे. गाभारा, अंतराळ मंडप व मुखमंडप ही प्रमुख अंगे असली तरी मुख्य चौरस अधिष्ठानावर ती उभी राहिली. गर्भगृह आतून व बाहेरून चौरसच असते. बाहेरच्या भिंतीची जाडी मध्यभागी उभ्या पट्ट्यांनी वाढवलेली असते. त्यामुळे यादव मंदिरासारखेच रथ निर्माण होतात, पण या विधानास कोठेही नक्षत्राकार येत नाही. आयताकार अंतराळ व चौरसकृती मंडपाच्या बाह्यांगावर मूर्तीकाम फारसे नाही. त्यामुळे लक्ष शिखराकडे जाते. सफाईदार बाह्यरेषांमुळे दृष्टी अमलकापर्यंत जाते. अंगासरशी (सलग अशी) असणारी अर्धशिखरे कोठेही अडसर वाटत नाही. तथापि, मूळ मंदिराची प्रकृती न समजल्यामुळे टोक्याचे सिद्धेश्वर मंदिर हे काहीसे खुजे व बसकट वाटते. अन्यथा या काळातील मंदिरावर बाकदार बाह्यरेषांचे उंचच उंच शिखर हा स्थायिभाव त्र्यंबकेश्वर तसेच नेवासा येथील मोहिनीराज मंदिरामध्ये फारच सुंदर रितीने व्यक्त होतो.

या मंदिराचे स्तंभ पैलूदार आहेत. पण त्यावर कोरीवकाम नाही. मंडपाचा किंवा गाभाऱ्याचा घुमटही साधा आहे. फारसे नक्षीकाम नाही पण घडणी आणि बांधकामाच्या सफाईदारपणामुळे ते जास्त लक्षात राहते.

राजस्थानी मुघल कलापरंपरांचा प्रभाव किती खोलवर पोहोचला होता व हा शिल्पप्रकार साकार करण्यात मराठी शिल्पकारांनी किती यश मिळविले होते, याची यथातथ्य कल्पना टोके येथील सिध्देश्वर मंदिरातील दगडी ओवऱ्यांवरून येते. ही ओवरी संपूर्ण दगडी बांधणीची आहे. दोन्ही बाजूला सुरूच्या अत्यंत घाटदार खांबांच्या ओळी आहेत. खांबांच्या ओळी जोडण्यासाठी दगडाच्या महिरपीच्या कमानी आहेत. दोन्हीसाठी साधा काळा पत्थर वापरलेला आहे. दोन्हीवर कसलेही विशेष नक्षीकाम नाही. पण त्यांचे आकारमान डौलदार आहे. त्यांची मांडणी अशा कल्पकतेने केलेली आहे की पाहणाऱ्यांच्या मनावर हे शिल्प कायमचा ठसा उमटवून जाते.[४]

अनुक्रमणिका

पूर्वाभिमुख अथवा उत्तराभिमुख बहुतांशी मंदिरे एका आयताकार आवाराच्या मध्यभागी असतात आवाराच्या भोवती ओवऱ्या बांधलेल्या असत. टोक्याच्या सिध्देश्वर मंदिराच्या उत्तर बाजूला असलेल्या ओवरीचा मुद्दाम उल्लेख करावयास हवा. या ओवरीत सुरूचे खांब व महिरपीच्या कमानी आहेत. हे बांधकाम अत्यंत सुबक घडणीच्या पाषाणांचे आहे. त्र्यंबकेश्वर मंदिर सोडले तर असे सुबक काम असणाऱ्या व प्रशस्त अशा ओवऱ्या अन्यत्र फारशा दिसत नाहीत. आवाराच्या प्रवेशद्वारावर नगारखानाही असे. मुख्य मंदिराच्या विधानाचे तीन भाग असतात. गाभारा, अंतराळ व मंडप. पैकी गाभारा व मंडप चौरस तर अंतराळ आयताकार असते.

**तिर्ढे** (ता. अकोले)-

अकोलेपासून २४ कि.मी. वायव्येस असलेल्या तिर्ढे येथे असणाऱ्या टेकड्यांजवळ हत्तीखाना (पिलखाना) आहे. आज ही वास्तू खंडीत स्वरूपात उभी आहे.

**थूगाव** (सुगाव) (ता. अकोले)-

अकोलेपासून ३ कि.मी. पूर्वेस असलेले हे गाव संगमनेर-अकोला मार्गावर आहे. येथे हेमाडपंथी मंदिराचे अवशेष असून हे मंदिर खंडित स्वरूपात आहे.

**नेवासा** (ता. नेवासा, १९० ३४ 'उ., ७५००० ' पू.)-

हे तालुका मुख्यालयाचे ठिकाण असून १३.२ चौ.मी. जागेवर वसले आहे. २०११ च्या जनगणनेनुसार येथील लोकसंख्या ३,२६,६९८ एवढी आहे.

नेवासा हे शिवस्थान आहे. 'जवाआगळी काशी' म्हणून प्रसिद्ध आहे. कोटी शिवलिंग येथे आहेत असे लोकस्मृती मानते. पूर्वी प्रवरा येथे दक्षिणवाहिनी होती. लोकस्मृतीनुसार येथे असलेल्या पांढरीच्या टेकडीस जवाएवढी खिंड पडली व ती फोडून नदी गावामधून पूर्ववाहिनी होत वाहू लागली. मूळ गावाचे 'नेवासे खुर्द' आणि 'नेवासे-बुद्रुक' असे दोन भागात विभाजन केले. 'नेवासे खुर्द' मध्ये मोहिनीराजाचे जुने आणि नवे देवालय आहे. जुन्या मंदिरास शहाजी भोसलेंकडून अनुदान मिळत असे.

नवीन मंदिर इ. स. १७७३ मध्ये गंगाधर यशवंत चंद्रचूड यांनी बांधले आहे. मंदिराला अलंकृत सजावट असून गाभाऱ्यात मोहिनीराज किंवा विष्णूची मूर्ती आहे. मोहिनीराजची मूर्ती अर्धनारी नटेश्वर/स्त्रीरुपातील विष्णूची आहे. सभामंडपात गणपती, शंकर, पार्वती, शनी, मारुती या मूर्ती आहेत. येथे माघ शु. पौर्णिमा ते माघ वद्य पंचमीपर्यंत उत्सव असतो.

मोहिनीराज देवालयाजवळ काण्णव देशपांडे यांच्या वाड्यात एक शिलालेख सापडला.याचा काळ शके ११६१ (इ. स. १२३९-४०) असा आहे. या शिलालेखातील भाषा संस्कृत-मराठी मिश्र असून त्यातील लिपी बाराव्या शतकातील देवनागरी आहे. श्री. शं. गो. तुळपुळ्यांच्या मते हा लेख यादव सिंधण यांच्या राजवटीतील असावा.

अनुक्रमणिका

या लेखात श्री. सीलू पंडित या पुराण सांगून चरितार्थ चालविणाऱ्या माध्यंदिन शाखेच्या शौनक गोत्री ब्राह्मणाने पांपूविहरि गावाच्या शिवारातील करमुक्त केलेली स्वत:च्या वृत्तीतील १८ निवर्तने जमीन कनैरेश्वर देवालयाला दान दिल्याचा उल्लेख आहे. हीच जमीन देवपुरुषाने जीवन नामक व्यक्तीस दान दिली.[५]

तसेच 'नेवासे बुद्रुक' भागात खंडोबाचे मंदिर आहे.

माळीमोह हे अगदी जवळचे लहानसे गाव. लालमोड हेसुध्दा अगदी जवळचे सुभ्याचे ठिकाण. आजही दोन्ही गावे मुळात होती तशी नेवाशात सामील आहेत. यादवकाळातील अवशेष येथे मोठ्या प्रमाणात विखुरलेले आहेत. लालमोड टेकडी प्रागैतिहासिक अवशेषांसाठी ज्ञात आहे. आहे. प्रवरेकाठच्या या पुरातत्वगर्भ क्षेत्राचे उत्खनन डॉ. ह. दि. संकालिया, डॉ. शां. भा. देव यांनी केले असून हा उत्खनन अहवाल प्रकाशित केला आहे.[याबाबतचे तपशील या ग्रंथातील प्र. ४ इतिहास यात दिले आहेत.]

नदीच्या प्रवाहाचे परिवर्तन ही घटना चक्रधर व ज्ञानेश्वरांच्या नंतर पण मध्ययुगाच्या प्रारंभिक काळात घडली असावी. म्हणून तेव्हाचे नेवासा हे साहित्यातून व पुरातत्वीय अवशेषातून तपासता येते. लालमोड टेकडीवर असलेल्या श्री करवीरेश्वर (कनैरेश्वर) शिवाचे मंदिर होते. या मंदिरातील खांबाला टेकून ज्ञानेश्वरांनी (१२७१-१३००) 'भावार्थदिपीका'-ज्ञानेश्वरी सांगितली व सच्चिदानंद बाबा कुलकर्णी यांनी ती लिहून घेतली.६ या खांबावर करवीरेश्वरास नंदादीपासंबंधी दिलेल्या वर्षासनाविषयी एक लेख कोरलेला आहे. नेवाश्यातील प्रवाहित होणारी प्रवरा नऊ मैलांनंतर 'प्रवरा संगम' येथे गोदावरीस मिळते. येथे 'टोके' या ठिकाणी सिध्देश्वर मंदिर तर कायगाव येथे 'कायेश्वर' मंदिर आहे ।. याच परिसरात रामेश्वर, भद्रादेवी मंदिर ही ठिकाणे आहेत. नेवाश्याचा सगळा परिसर म्हणजे मुळा-प्रवरा संगमापासून गोदा-प्रवरा संगमापर्यंतचा परिसर 'नेवासा क्षेत्र' म्हणून ओळखला जातो व याला महालय क्षेत्र म्हटले आहे.

नेवाशाचे सांस्कृतिक महत्त्व सांगणारी अनेक वाङ्मयीन साधने आहेत.[नेवाशाचे सांस्कृतिक महत्त्व सांगणारे तीन संस्कृत महात्म्य यांची नोंद याच ग्रंथात श्रीमती अरूणा ढेरे यांनी घेतली आहे.]

प्रवरेच्या तिरावरील या क्षेत्रात यादवपूर्व काळापासून घाट बांधलेले होते. येथे काही मठ व धनेश्वर, शनेश्वर, कपिलेश्वर, करवीरेश्वर, खोलेश्वर, केदारेश्वर, मधुरेश्वर अशी अनेक मंदिरे होती. येथे प्राचीन कोटही होता व कुबेराचा निधी या कोटात असल्याचा भाविकांचा विश्वास आहे. नदीकाठी मुगुटेश्वरीचे एक स्थान आहे. जवळ एक शिवालय आणि दगडी कुंड आहे. या स्थानाचे सर्वेक्षण य. रा. गुप्ते यांनी केले. त्यांच्या मते पाचव्या शतकापासून तेरा-चौदाव्या शतकापर्यंतचे अवशेष येथे सापडतात. नेवासे एक राजकीय केंद्र, एक महत्त्वाची बाजारपेठ म्हणून यादव काळात प्रसिध्द होते. ज्ञानेश्वरांनी या स्थळाचा उल्लेख करताना म्हटले-

"तेथ भूवनैकपवित्र । अनादि पंचक्रोशक्षेत्र

जगाचे जीवनसूत्र । जेथ श्रीमहालसा॥ (ज्ञानेश्वरी १८-१७२)

अनुक्रमणिका

जगाचे जीवनसूत्र असे नेवाशाच्या महालसेचे वर्णन ज्ञानेश्वरांनी केले आहे. ज्ञानेश्वरांनी आपल्या शैव तत्त्वज्ञानाच्या बैठकीवरून मोहिनीराजाचे स्वरूप वर्णन केले आहे. नेवाशाच्या स्थानिक देवतेला ज्ञानदेवांनी आध्यात्मिक अनुभूतीने भारतीय तत्त्वज्ञानाच्या केंद्रस्थानी नेऊन बसविले हे विशेष.

**नेवाशातील इतर मंदिरे :**

नेवासा परिसरातील गोधेगाव या गावामध्ये साधारण तेराव्या शतकातील तीन मंदिरे असून ती यादव शैलीतील आहेत. मारगळनाथ मंदिर व रामेश्वर मंदिर या नावाने ती ओळखली जातात. साधारणपणे गर्भगृह, अंतराळ, सभामंडप अशी रचना असलेल्या मंदिराचे स्तंभ हे चांगल्या प्रकारचे शिल्पकाम असलेले आहेत. मारगळनाथ मंदिरातील स्तंभ शिर्षावर असलेले तरंगहस्त हे नागबंधयुक्त आहेत. वस्तीलगत असलेल्या एका टेकडीवर सुडोलेश्वर या नावाने ओळखले जाणारे तिसरे मंदिर आहे. या मंदिरापुढे एक चौरस आकाराची बारव आहे.

नेवासा येथे एक ज्ञानेश्वर मंदिर आहे, ज्याचा जीर्णोध्दार करण्यात आला आहे. या मंदिरात विठ्ठल-रखुमाईच्या मूर्तीबरोबर ज्ञानेश्वर व तुकाराम यांची मूर्ती आहे. मंदिरात कळसावर सोन्याचा पत्रा बसविलेला आहे. मंदिराशेजारी वाचनालय व अतिथीगृह आहे. फाल्गुन वद्य एकादशीला येथे उत्सव असतो.

शंकराच्या अष्ट स्थानांपैकी संगमेश्वर, गौतमेश्वर व घोटेश्वर ही तीन मंदिरे नेवासा तालुक्यात प्रवरा संगमावर आहेत. यामध्ये शिवलिंग काळ्या दगडाचे आहे. संगमेश्वरचे मंदिर हे हेमाडपंथी शैलीतील असून शंकराच्या अष्ट स्थानांपैकी हे सर्वात पवित्र स्थान मानले जाते. सिध्देश्वराची पालखी संगमेश्वरला आणली जाते.

गौतमेश्वर व घोटेश्वर ही दोन्ही मंदिरे साध्या बांधणीची आहेत. घोटेश्वर मंदिराबद्दल असे म्हटले जाते की, समुद्रमंथनाच्यावेळी अमृतकुंभ ज्या ठिकाणी ठेवला होता त्या ठिकाणी हे मंदिर बांधले आहे.

नेवासा परिसरातील सोनाई मंदिर किंवा शिंगणापूर येथील शनिमंदिर लहान असून त्याला छप्पर नाही. शनिची साडेपाच फूट उंचीची मूर्ती उंच चबुतऱ्यावर ठेवली असून एका बाजूस त्रिशूळ आहे. दक्षिणेला नंदीची प्रतिमा असून समोर महादेव व मारुतीच्या लहान मूर्ती आहेत. दर अमावस्येला, विशेषत: शनिवारी असलेल्या अमावस्येला येथे मोठी जत्रा भरते.

**नेवासा येथील ताम्रपट :**

नेवासा येथील काळेगाव या गावात एका दगडी पेटीत एक ताम्रपट सापडला आहे. ज्याचा काळ शक संवत् ११८२ (इ. स. १२६१) असा आहे. या ताम्रपटातील भाषा संस्कृत असून त्यातील लिपी ही देवनागरी आहे.

हा ताम्रपट यादव नृपती महादेव याच्या राज्याभिषेक प्रसंगी दिलेला आहे. या प्रसंगी या ताम्रपटामध्ये ५२ ब्राह्मणांना कालुगाव दान दिल्याचा उल्लेख आहे. या दान दिलेल्या गावाचे नाव बदलून

अनुक्रमणिका

पट्टवर्धनपूर असे करण्यात आले. या गावाचे दान घेणारे ५२ ब्राह्मण २२ गोत्रांचे होते. ५२ पैकी ३० ऋग्वेदी, २१ यजुर्वेदी व १ सामवेदी ब्राह्मण होता.[७]

**ब्राह्मणवाडा** (ता. अकोले, १८०४५ 'उ., ७४० ४०' पू.)-

हे अकोलेपासून १९ कि.मी. अंतरावर दक्षिणेस असून येथे इ.स. १८१८ च्या कोरेगाव येथील लढाईत झालेल्या पतीच्या मृत्युमुळे मराठा सेनापती बापू गोखले यांची सून सती गेली. येथील सतीच्या दगडावर नेहमीप्रमाणे हात किंवा पंजा नसून पावलांचे ठसे आढळतात. हे सतीचे स्मारक म्हणून ओळखले जाते.

**भंडारदरा** (ता. अकोले, १९० ३२ 'उ., ७३० ४५' पू.) -

येथील विल्सन धरणामध्ये ११,०३९ द.ल.घ.फू. पाणी जमा होते. येथील मनोहरी दृश्यांमुळे तसेच कृत्रिम तलावात होणाऱ्या नौकानयनामुळे मुंबई शहरातील अनेक पर्यटक सुट्टीत येथे येतात. (या धरणाविषयी अधिक तपशील याच ग्रंथात स्वतंत्रपणे देण्यात आले आहेत.)

**रणदखुर्द रंधा धबधबा** (ता. अकोले) -

हे अकोलेपासून २१ कि.मी. अंतरावर पश्चिमेस असून या ठिकाणी ६०.९६ मी. उंचीचा धबधबा आहे. धबधब्यामुळे निर्माण झालेल्या खोल डोहामध्ये विविध प्रकारचे मासे आढळतात.

**राहुरी** (ता. राहुरी, १९० २० 'उ., ७४० ३५' पू.) -

२००१ च्या जनगणनेनुसार येथील लोकसंख्या २,९४,९२४ एवढी आहे. अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी हे तालुक्याचे ठिकाण आहे. समुद्र सपाटीपासून ५०० मीटर उंचीवर मुळा नदीच्या काठावर असलेल्या या नगराची जमीन सपाट असून पूर्वी पावसाळ्यात नदीच्या पुराचे पाणी गावात शिरत असे. मुळा नदीवर धरण बांधल्यापासून गेल्या ४० वर्षांत पुरापासून गावाचे संरक्षण झाले आहे. अनेक वर्षांपासून राहुरी, शेतमालाची मोठी बाजारपेठ वसलेली आहे. रेल्वे आणि रस्ते यांनी राहुरी महाराष्ट्रातील मोठ्या नगरांना जोडले गेले आहे. हवामान समशीतोष्ण, कोरडे असून येथील काळी जमीन सुपीक आहे. परंतु पर्जन्यमान कमी असल्यामुळे दर काही वर्षांनंतर या परिसराला अवर्षणाचा तडाखा बसतो.

**अर्थव्यवस्था** : राहुरीच्या अर्थव्यवस्थेतही शेती निगडित प्राथमिक क्षेत्र मोठे असून ऊस, ज्वारी, बाजरी ही येथील मुख्य पिके आहेत. मुळा आणि भंडारदरा धरणांच्या कालव्यातून सिंचन सुरू झाल्यावर येथे ऊस शेती वाढली. त्यापूर्वी राहुरी हे मोसंबीच्या बागांसाठी प्रसिध्द होते. उसाखालचे क्षेत्र वाढल्यामुळे येथे पारंपरिक धान्य शेतीचे प्रमाण कमी होत गेले आहे. फळे, भाजीपाला आणि दूध यांचेही उत्पादन राहुरीत होते. नगरातील ३९ टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे.

औद्योगिक उत्पादनाला चालना मिळावी म्हणून महाराष्ट्र औद्योगिक महामंडळाने राहुरीमध्ये औद्योगिक वसाहत स्थापन केली. परंतु ती यशस्वी ठरलेली नाही. फक्त कागदावर प्रक्रिया करणारा एक

लहान कारखाना येथे आहे, मात्र त्यातून फारसा रोजगार उत्पन्न झालेला नाही. इतर लहान उद्योगातून २.५७ टक्के रोजगार उपलब्ध झाला आहे.

राहुरी येथे एक रोजगारक्षेत्र तुलनेने मोठे असून कृषी बाजार, तालुका सरकारी कार्यालये, बँका, पतपेढ्या, उच्च शिक्षण संस्था यामध्ये बऱ्यापैकी रोजगार उपलब्ध आहे. राहुरी कृषी विद्यापीठ हे मुळा नदीच्या उत्तर काठावर असून त्याचा अंतर्भाव नगरच्या हद्दीत होत नाही. राहुरीला सरकारी आरोग्य सेवा केंद्र असून अनेक खाजगी इस्पितळे आहेत. मनमाड-नगर हा राज्य महामार्ग राहुरी नगरातून जात असल्याने प्रवासी वाहतुकीचे प्रमाण येथे जास्त आहे. सर्वाधिक रोजगार (५७ टक्के) याच क्षेत्रातून निर्माण झालेला आहे.

**वस्ती व प्रशासन** : राहुरीचे गावठाण मुळा नदीच्या दक्षिण किनाऱ्याला लागून आहे. सदर वसाहतीची रचना जुनी आणि दाटीवाटीची आहे. मनमाड-अहमदनगर या राज्य महामार्गामुळे गावाचे दोन भाग झाले आहेत. रस्त्यापलिकडे नवीन वसाहत होत आहे. त्या भागातील शेतजमिनीचा वापर निवासी उपयोगासाठी होत आहे. सुमारे ३,००० लोक झोपड्या बांधून गावात राहतात. शेतीच्या कामासाठी बाहेरून येणाऱ्या अंशकालीन मजुरांमुळे काही काळासाठी लोकसंख्या वाढते. त्यांच्यासाठी तंबू-राहुट्या टाकल्या जातात. तसेच राहुरी हे बाजाराचे गाव असल्याने बाजारपेठेत विविध प्रकारच्या वस्तूंचा मोठा व्यापार होतो.

मुळा नदीवर बांधलेल्या धरणामधून नगरला पाणीपुरवठा केला जातो. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने मलनि:सारण योजना आखली पण ती पूर्णत्वास नेलेली नाही. नगरात वीज, टेलिफोन, खाजगी-सरकारी बस सेवा उपलब्ध आहे. राहुरी रेल्वेने अहमदनगरला जोडले आहे.

राहुरी नगरपालिका सन १९७२ साली अस्तित्वात आली. राहुरी नगराचे सहा विभाग असून सहा नगरसेवकांच्या मार्फत नगराचे व्यवस्थापन पाहिले जाते.

**महात्मा ज्योतिबा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी :** एकूण प्रवरा खोऱ्याचा कायाकल्प करून कृषीक्रांती करणारे हे विद्यापीठ सन १९६८ पासून कार्यरत आहे. एक प्रयोगशील, कृतीशील कृषी विद्यापीठ अशी याची नोंद करावी लागेल. विद्यापीठातील विविध बांधकामे भारतातील प्रसिध्द वास्तुशिल्पी पद्मश्री अच्युत कानवंदे ह्यांनी केली आहेत. विविध प्रयोगातून संकरित बियाणांची निर्मिती, रासायनिक खतांचे योग्य नियंत्रण व विविध नवनवीन उपक्रम हे विद्यापीठ राबवित असून कृषी उपयोगी सुलभ व कार्यक्षम अवजारांची निर्मिती हे याचे एक वैशिष्ट्य नोंदवावे लागेल. एकूणच प्रवरा खोऱ्यातील पीक पध्दती संदर्भात विविधांगी संशोधन करून त्याला दिशा देण्याचे काम या विद्यापीठाच्या वतीने होत आहे. यासाठी विद्यापीठ प्रमुख म्हणून लाभलेल्या विविध कुलगुरूंचा सहभाग मोलाचा ठरला आहे.

**राहुरी येथील वैशिष्ट्यपूर्ण वास्तू :** मुळा नदीच्या काठी वसलेले खंडोबा मंदिर हे या भागातील वीस मंदिरांपैकी एक आहे. चैत्र वद्य प्रतिपदेला येथे मोठी जत्रा भरते. या जत्रेचे वैशिष्ट्य असे की, अनेक माणसांनी भरलेल्या बारा बैलगाड्या एकटा माणूस ओढतो.

गावात जोगेश्वरी आखाडा येथे असलेले जोगेश्वरी मंदिर हेमाडपंती शैलीतील असून या मंदिरामुळे या भागाचे नाव 'जोगेश्वरी आखाडा' असे पडले. येथे सखाराम महाराज यांची समाधी आहे. ते आपल्या दिव्य शक्तीने सर्पदंश झालेल्या व्यक्तींना बरे करत. अशी श्रध्दा आहे.

यादवकालीन काही ताम्रपट येथे मिळाले आहेत त्यांचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**देवळाली ताम्रपट, यादव भिल्लम (तृतीय) (संच-अ) :** देवळाली ता. राहुरी येथील या ताम्रपटाचा काळ शके ९७४ (इ.स. १०५२) असा आहे. या ताम्रपटातील भाषा संस्कृत असून त्यातील लिपी ही अकराव्या शतकातील नागरी लिपी आहे. देवगिरीचा यादव नृपती भिल्लम (तृतीय) याच्या संदर्भातील हा ताम्रपट आहे.

हे दानपत्र असून याचा मुख्य हेतू देवगिरीचा यादव नृपती भिल्लम (तृतीय) याने श्रीधर या श्रीवत्स गोत्री ब्राह्मणास कोणंथा, रूयी, पिप्पलत्था आणि जुमरहर ही गावे दान दिली हे नमूद करण्याचा आहे. यावेळी बीज, महेश्वर, गुणिगु आणि भारथैव हे अधिकारी उपस्थित होते. तसेच श्रीपती आणि मंख हे सामंत ही उपस्थित होते. यापुढे येणारे राजे या चारही गावांचे चांगले रक्षण करोत अशी प्रार्थना केली आहे. हे दानपत्र तैकतैय याने तयार केले आणि सोहनैयपुत्र भ्रत्त किंवा भरथ याने लिहिले. या दानपत्रात यादव राजांची वंशावळ दिलेली आहे.

**देवळाली ताम्रपट, यादव सेउणचंद्र (द्वितीय) (संच-ब) :** या ताम्रपटाच्या काळाचा उल्लेख नसून अंदाजे इ.स. १०७६ ते १०९८ या काळातील तो असावा. या ताम्रपटातील भाषा संस्कृत असून त्यातील लिपी अंकराव्या शतकातील नागरी लिपी आहे. यादव नृपती सेउणचंद्र (द्वितीय) याच्या संदर्भातील हा ताम्रपट आहे.

या ताम्रपटाचा मुख्य उद्देश यादव नृपती सेउणचंद्र (द्वितीय) याने कुमरहर ऐवजी देउलवली हे गाव श्रीधर यास दान दिले हे नमूद करण्याचा आहे. याशिवाय सेउणचंद्र (द्वितीय) याने स्वत:चे राज्य शत्रूंपासून वाचविले, चालुक्य राजा विक्रमादित्य (सहावा) याला शत्रूंशी मुकाबला करण्यात मदत केली आणि कल्याण राज्यात त्याची नेमणूक केली, तसेच त्याने कोकणच्या राजालाही मदत केली हे नमूद केले आहे.[८]

°**शनि शिंगणापूर** (तालुका नेवासा) :

नेवासा तालुक्यातील सोनाई गावी स्थित शनि शिंगणापूर हे धार्मिक स्थळ अनेक भक्तांचे श्रध्दास्थान आहे. या स्थानाचे वैशिष्ठ्ये म्हणजे येथील घरांना दरवाजे नसून फक्त दारांना चौकटी असतात. येथे चोऱ्या होत नाहीत याचे कारण म्हणजे हे एक जागृत देवस्थान आहे. चोरीचा प्रयत्न करणाऱ्यावर शनिची अवकृपा होते अशी येथील ग्रामस्थांची श्रध्दा आहे.

**शिर्डी** (तालुका रहाता, १९० ४५ 'उ, ७४० २५' पू.) :

अनुक्रमणिका

रहाता तालुक्यातील शिर्डी येथील साईबाबा मंदिर हे धार्मिक स्थळ अनेक भक्तांचे श्रद्धास्थान आहे. सन २००० पर्यंत शिर्डीचा समावेश कोपरगाव तालुक्यात होत होता. मात्र सन २००० मध्ये रहाता तालुक्याची निर्मिती होऊ न त्याचा समावेश या तालुक्यात करण्यात आला. शिर्डी येथील मुख्य यात्रा म्हणजे ‘रामनवमीचा उत्सव’. प्रतीवर्षी चैत्र शुद्ध अष्टमी व नवमीला ही यात्रा भरते. याच बरोबर गुरू पौर्णिमा व गोकूळ अष्टमीचाही उत्सव येथे साजरा केला जातो. आषाढ शु. १५ ला गुरुपौर्णिमेची यात्रा असते तर श्रावण वद्य अष्टमीला गोकूळ अष्टमीची यात्रा भरते.

**श्रीरामपूर** (तालुका श्रीरामपूर) -

हे श्रीरामपूर तालुक्याचे मुख्यालय असून एक व्यापारी केंद्रसुद्धा आहे. श्रीरामपूर नगरपालिकेची स्थापना १ सप्टेंबर १९४७ रोजी झाली. श्रीरामपूरमध्ये भंडारदरा प्रकल्पाच्या निर्मितीनंतर साखर कारखान्यांची झालेली उभारणी व त्याअनुषंगाने आलेली आर्थिक सुबत्ता पहावयास मिळते.

गावामध्ये नोंद घेण्यासारखी जी स्मारके आहेत त्यात राम मंदिराची नोंद घ्यावी लागते. एकोणिसाव्या शतकाच्या तिसऱ्या-चौथ्या दशकामध्ये येथे राम मंदिराची उभारणी करण्यात आली. एक गाभारा व त्या समोरील सभागृह अशी या मंदिराची उभारणी असून गर्भगृहात राम, लक्ष्मण व सीतेच्या संगमरवरी मूर्त्या आहेत. गाभाऱ्याच्या बाहेर विठ्ठल-रुक्मिणी, दत्तात्रय, सावता माळी यांच्या प्रतिमा आहेत. प्रती वर्षी रामजन्मोत्सव चैत्र शुद्ध नवमी ते चैत्र शुद्ध एकादशीपर्यंत साजरा होतो. मंदिराच्या आवारात पारसनाथ, शनि, हनुमान, शीव व गणेश यांची लहान मंदिरे आहेत. गावात श्रीराम मंदिर व शनि मंदिरात यात्रा भरते विशेषत: रामाची यात्रा मोठी असते. दर शुक्रवारी येथे गुरांचा बाजार भरतो.

**संगमनेर** (ता. संगमनेर, १९० ३४ ‘उ, ७४० १६’ पू.) -

अहमदनगरच्या वायव्येस ८० कि.मी. अंतरावर असलेले संगमनेर हे तालुका मुख्यालय आहे. सन १८६१ साली येथे नगरपालिका स्थापन झाली. सन २००१ च्या जनगणनेनुसार येथील एकूण लोकसंख्या ४,४१,४३९ एवढी आहे.

शिलालेखांच्या आधारे या ठिकाणास संगमनगर किंवा संगमनेरा असे संबोधले जात असावे हे लक्षात येते. तत्कालीन यादव घराण्याचा राजा भिल्लम द्वितीय याच्या संदर्भातील ताम्रपटामध्ये ‘संगमनगर’ असा याचा उल्लेख आढळतो.[९] याचा काळ शके ९२२ (इ.स. १०००) असा आहे. या ताम्रपटाचा मुख्य उद्देश भिल्लमाने काही जमीन भिन्न गोत्री २१ ब्राह्मणांना दान दिली हे नमूद करणे हा होता.[१०]

यादव राजा ऐरमदेव याच्या संदर्भातील आश्वी ताम्रपटात संगमनेरचा उल्लेख ‘संगमनेरा’ असा करण्यात आला व हे ८४ गावांच्या प्रशासकीय विभागाचे मुख्यालय होते.[११] या ताम्रपटात महामंडलेश्वर ऐरमदेव याने पाच प्रधानांच्या अनुमतीने कोंकणे हे संगमनेर ८४ व श्रीनगर २५०० मधील सेऊ ण देशातील खेडे कूकल नावाचा पंडित व इतर ३० ब्राम्हणांना दान दिले हे नमूद केले आहे.[१२] यासंदर्भावरून असे लक्षात येते की, साधारणपणे दहाव्या व अकराव्या शतकात सेऊ ण देशातील यादवांच्या राज्यात प्रवरा नदीच्या तिरावर वसलेले संगमनेर हे एक अत्यंत महत्त्वाचे ठिकाण होते. ‘संगमनगर’ किंवा ‘संगमनेरा’ या

अनुक्रमणिका

स्थल नामांमध्ये शब्दाच्या शेवटी आलेले ‘नगर’ किंवा ‘नेरा’ हे शब्द असे दर्शवितात की, हे ठिकाण ऐतिहासिक काळात एक शहरी ठिकाण होते.[१३]

**संगमनेरचे ऐतिहासिक महत्त्व स्पष्ट करणाऱ्या इतर ठिकाणांचे वर्णन खालीलप्रमाणे**

येथे ख्वाजा मुहम्मद सादेकचा दर्गा आहे. लहान घुमट असलेला हा दर्गा सम्राट आलमगीरच्या ख्वाजा मुहम्मद सादेक या शिक्षकाचा असून इ.स. १६५९ साल असलेले दोन शिलालेख येथे आहेत.

येथे असलेल्या जुन्या किल्ल्यातील हमामखान्याचे रूपांतर दर्ग्यात करण्यात आले आहे. त्या संताच्या आठवणीप्रीत्यर्थ येथे दिवे व हिरव्या पताका लावल्या जातात.

हणमंत नाईक यांची येथे समाधी आहे. हणमंत नाईक हा किल्लेदार मराठ्यांबरोबर झालेल्या लढाईत मारला गेला. त्याची ही समाधी असून भिल्लांसाठी हे एक पवित्र स्थळ आहे. या समाधीजवळ काही लहान समाध्या आहेत.

संगमनेर येथे जुने मुसलमानी कबरस्तान असून येथे हिंदू मंदिराचा एक स्तंभ आहे.

इ.स. १८७४ साली संगमनेरचा उपविभागीय अधिकारी (sub-divisional officer) देव मामलातदार हे त्याच्या धामिर्क प्रवृत्ती मुळे सत पुरुष मानले जात. अनेक लोक त्याच्या दर्शनासयेत.

तसेच येथे एक मशीद आहे, ज्यात इ.स. १७०७-०८ या सालचा ‘दैवी कृपेने स्थापन झालेली’ (Established by Divine favour H १ १ १९) अशा आशयाचा शिलालेख आहे. मात्र तो सध्या पुसट झाल्याने वाचण्यायोग्य नाही.

**संगमनेर परिसरातील प्रवरेवरील घाट** [श्री. संतोष खेडलेकर, संगमनेर इतिहास संशोधन मंडळ, संगमनेर यांनी पुरविलेल्या माहिती आधारे.]:

प्रवरानदी संगमनेरात प्रवेश करते ते स्थळ गंगामाईचा घाट म्हणून प्रसिद्ध आहे. या ठिकाणापासून या विभागात अनेक प्राचीन मंदिरे, मठ आहेत. परंतु त्यांच्या नावाने हा परिसर ओळखला जात नाही. अनेक ठिकाणी नदीकाठचा परिसर तेथील मंदिरांच्या नावाने ओळखला जातो. कदाचित या परिसरातील घाटांची संख्या पाहूनच याला गंगामाईचा घाट म्हणून ओळखले जात असावे.

गंगामाईचे मंदिर ते भवानी-शंकर मठा पर्यंतच्या सुमारे ४०० मीटर परिसरात सलगपणे घाट बांधण्यात आले. अनेक ठिकाणी पायऱ्यांचे घाट काळाच्या ओघात नामशेष झाल्यावर नव्याने केवळ भिंती बांधण्यात आल्या.

प्रवरेच्या घाटांचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक घाट वेगळ्या धाटणीचा आहे. ज्या दानशुरांनी हे घाट बांधले आहेत, त्यांनी प्रत्येकानी आपली स्वतंत्र कलादृष्टी वापरली. संगमनेर शहराच्या हद्दीतच एकूण ११

टप्प्यात हे घाट बांधलेले आहेत. काही विशिष्ट अंतर ठेवून, तर काही एकमेकांना लगत अशा पद्धतीने हे घाट बांधलेले आहेत.

यातील पहिला टप्पा सुरू होतो तो गंगामाई मंदिराच्या बाजूला असलेल्या घाटापासून. ह्या घाटांची लांबी ४ मीटर व ७.६२ सें.मी. व रुंदी ३ मीटर आहे. या घाटाची जमिनीपासूनची उंची २ मीटर ७.६२ सें.मी. असून याला एकूण ११ पायऱ्या आहेत. प्रत्येक पायरी २२.८६ सें.मी. उंचीची आहे.

दुसऱ्या टप्प्यातील घाट अगदी अलिकडच्या काळातील आहे. याची लांबी ४ मीटर व ४ इंच असून याला एकूण १६ पायऱ्या आहेत.

तिसऱ्या टप्प्यातील घाट हा विद्यमान कृषीमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या निधीतून सन १९९० मध्ये बांधण्यात आला. याची लांबी १९ मीटर व २२.८६ सें.मी. असून रुंदी ९ मीटर आहे. एकूण १७ पायऱ्यांचा हा घाट आहे.

चौथ्या टप्प्यातील घाट सन १९५४ मध्ये पांडुरंग रामबकस यांनी बांधल्याची नोंद तेथील कोनशिलेवर आढळते. हा घाट ७ मीटर व १२.७ सें.मी. लांबीचा आहे.

पाचव्या टप्प्यातील घाट अगदी नव्याने बांधलेला आहे. याची लांबी ९ मीटर व ७.६२ सें.मी. व रुंदी ८ मीटर आहे.

अतिशय सुंदर बांधकाम असलेला सहाव्या टप्प्यातील घाट केशवतीर्थ या परिसरात आहे. या घाटाची लांबी ३८ मीटर आहे. यात तीन टप्पे पाडलेले आहेत. पहिला व दुसरा टप्पा प्रत्येकी ९ मीटर व तिसरा टप्पा ७ मीटर लांबीचा आहे. मधल्या भागात दगडी बांधकाम आहे. या घाटाची रुंदी सुमारे ५ मीटर आहे. अतिशय सुंदर असे गोमुख या घाटाला जोडलेले आहे. केशवतीर्थावरील महादेवाच्या मंदिरातील पाणी या गोमुखावाटे बाहेर पडते.

या घाटावरील कोनशिलेनुसार माघ शुद्ध १३ शके १८६४ (गुरुवार) रोजी घाटाचे काम पूर्ण झालेले आहे. या घाटाच्या वरती केशवतीर्थाजवळ सध्या १५ समाध्या आढळून येतात. यातील केवळ एका समाधी मंदिरावर सिद्धामंद राजाराम महाराज असे नाव कोरलेले आहे. मात्र इतर समाध्या कोणाच्या आहेत हे सांगता येत नाही.

सातव्या टप्प्यातील घाट पूर्वी मोठा बांधलेला असावा असे वाटते. प्रवरेच्या पाण्याच्या आघातामुळे त्याची पडझड झाल्याने या ठिकाणी सिमेंटची पक्की भिंत बांधलेली आहे.

आठव्या टप्प्यातील घाट हा अतिशय जुने बांधकाम असलेला घाट आहे. दोन टप्प्यात बांधलेल्या या घाटांची एकूण लांबी १३ मीटर व ७.६२ सेंमी. तर रुंदी ६ मीटर व ५.०८ सेंमी. इतकी आहे. या घाटाच्या बांधकामात एक कोनशिला दिसून येते. त्यानुसार बाळाराम गुलाबचंद लाहोटी यांनी १ एप्रिल १८६१ रोजी या घाटाचे बांधकाम केले आहे. याचे वैशिष्ट्य म्हणजे याठिकाणी ६.४ मीटर व १५.२४ सेमी. लांबीची दगडी आरामदायी बैठक तयार करण्यात आलेली आहे. हनुमानाची एक मूर्तीही या ठिकाणी कोरण्यात आली

आहे. घाटाच्या पायऱ्या जसजशा खाली जातात त्यानुसार या घाटाच्या कठड्यांना तिरपा उतार देण्यात आलेला आहे.

नवव्या टप्प्यातील घाटदेखील अतिशय जुना आहे. या घाटाच्या पायऱ्या तीन टप्प्यात बांधलेल्या आहेत. या घाटाची एकूण लांबी १८ मीटर आहे तर रुंदी ४ मीटर इतकी आहे. एकूण १८ पायऱ्यांचा हा घाट आहे.

दहाव्या टप्प्यातील घाट अतिशय देखणा व जुन्या पद्धतीचा आहे. घाटाची लांबी १० मीटर तर रुंदी ५ मीटर इतकी आहे. घाटाच्या वरच्या बाजूला छोटेसे गणपती व शंकराचे मंदिर आहे. अतिशय कलात्मक दृष्टीने हा घाट बांधलेला आहे.

अकराव्या टप्प्यातील घाट हा सर्वाधिक वापर असलेला व सर्वात मोठा असा घाट आहे. एकूण ७६.२ मीटर लांबीच्या या घाटात दोन भागात पायऱ्या बांधण्यात आलेल्या आहेत. घाटाच्या पायऱ्याही तीन टप्प्यात बांधण्यात आलेल्या आहेत. याची रुंदी ९ मीटर इतकी आहे.

संगमनेरची हद्द ओलांडल्यावर जोर्वे या प्राचीन गावात दत्त मंदिराच्या बाजूला अतिशय सुंदर असा घाट बांधण्यात आला आहे. दत्त मंदिरातून बाहेर पडले की, बाहेर ओट्यावर एक महादेवाचे व एक मच्छिंद्रनाथाचे मंदिर आहे. घाटाला दोन गोलाकार बुरूज आहेत. तीन ठिकाणाहून नदीत उतरायला पायऱ्या केलेल्या आहेत. या घाटाची रचना करताना नदीच्या लगत १.८ मीटर उंचीचे व १.५ मीटर रुंदीचे मोठे मोठे कोनाडे (देवळी) तयार करण्यात आलेले आहेत. या घाटाची एकूण लांबी ३९.६ मीटर व रुंदी ५.७ मीटर इतकी आहे. घाटाच्या एका बाजूला पायऱ्यांजवळ चर्तूभूज गदाधारी मूर्ती कोरलेली आहे.

याच घाटाला लागून तत्कालीन कृषीमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या निधीतून नव्याने घाटाचे बांधकाम करण्यात आलेले आहे. २००३ साली बांधण्यात आलेल्या या घाटाला विजयघाट असे नाव देण्यात आलेले आहे. हा नवीन घाट ४० मीटर व १०.१६ सेंमी. लांबीचा असून त्याला १२ पायऱ्या आहेत. सध्या नदीचे पात्र घाटापासून बरेच दूर सरकलेले असल्याने घाटाचा उपयोग पायऱ्या उतरून नदीपात्राकडे जाण्यासाठी केला जातो.

## प्रवरा खोऱ्यातील किल्ले

[ श्रीअमित बोरोले ., स्थापत्य अभियंता यांनी ही नोंद केली आहे.]।

हिंदुस्थानातील पर्वतांमध्ये हिमालयाच्या खालोखाल विस्तार सह्याद्रीचाच आहे. दक्षिणोत्तर पसरलेल्या या पर्वतांची लांबी साधारणपणे १५०० कि.मी. आहे. सह्याद्रीच्या शिरोभागापासून अनेक डोंगररांगा निघतात. यापैकी पश्चिमेकडे जाणारे फाटे थेट सागरतिरी जाऊन मिळतात, तर देशपठारावर जाणारे काही पूर्वफाटे अगदी ६० ते ७० कि.मी. पेक्षाही जास्त विस्तारलेले आहेत. यामध्ये सातमाळा, अजंठा, बालेश्वर-बालाघाट आणि शंभूमहादेव, महाबळेश्वर हे सर्वात प्रमुख आणि अवाढव्य असे फाटे आहेत. जशा या सह्याद्रीच्या उपरांगा आहेत तसेच या पर्वतावरून उगम पावणाऱ्या नद्यांमुळे सह्याद्रीत अनेक खोरीसुध्दा निर्माण झालेली आहेत. यात गोदावरी खोरे, कृष्णा खोरे, पवनाखोरे, भीमाखोरे, प्रवरा खोरे यांचा समावेश होतो. या प्रकरणात प्रवरा खोऱ्यातील किल्ल्यांबद्दल माहिती दिली आहे.

अनुक्रमणिका

प्रवरा नदीचा उगम होतो तो कुलंग आणि रतनगड या सह्याद्रीमधील दोन किल्ल्यांच्या डोंगरामधून.इगपुरीच्या आग्नेयेस असणाऱ्या या डोंगररांगेला बालेश्वर-बालघाट असे म्हणतात. येथून दोन नद्यांचा उगम होतो. एक प्रवरा तर दुसरी मुळा. बालाघाटाच्या घनचक्कर या उपरांगेमुळे या दोन्ही नद्यांची खोरी विभागली गेली आहेत. कळसूबाई शिखर हे महाराष्ट्रातील सर्वोच्च शिखर. सह्याद्रीचा हा शिरोमणीसुध्दा या प्रवरा खोऱ्यामधलाच. केवळ कळसूबाई नव्हे, तर त्या सोबत रतनगड, हरिश्चंद्रगड, पाबरगड, अलंग, मदन, कुलंग हे सुध्दा या प्रवरा खोऱ्यात येणारे किल्ले आहेत. दाट जंगल, दळणवळण योग्य नसणे, उंच कडे कपारे, कुठेही उतरून जायचे तर किमान १००० मी. ची खोली उतरून जावीलागते. यामुळे हा प्रवरा खोऱ्याचा प्रदेश महाराष्ट्राच्या सांस्कृतिक केंद्रापासून काहीसा वेगळा झाला आहे. सामाजिकदृष्ट्या विचार केला तर कोळी व ठाकूर या आदिवासींची वस्ती येथे जास्त आहे.

येथील विविध किल्ले असे :-

**अलंग** (उंची १,४७० मी.) : अलंग, मदन आणि कुलंग हे सह्याद्रीमधील तीन दुर्गत्रिकूट नाशिक आणि नगरच्या वेशीवर आहेत. सह्याद्रीमधील कठीण अशा किल्ल्यांमध्ये अलंग गडाने पहिला क्रमांक पटकावला आहे. घोटी-इगतपुरी मार्गावरून हे किल्ले आपले लक्ष वेधून घेतात. घनदाट जंगल, वहिवाटीत नसणाऱ्या वाटा, विरळ वस्ती यामुळे या परिसरातील भटकंती थोडी त्रासदायक आहे. एका बाजूला दारणेचे खोरे तर दुसऱ्या बाजूला प्रवरेचे खोरे यामुळे या परिसरात वाहतुकीचे प्रमाण फारच कमी आहे.

अलंगला जायचे असल्यास इगतपुरी-घोटी-पिंपळनेरमोर मार्गे आंबेवाडीला यायचे. आंबेवाडीहून किल्ल्यावर जायचा मार्ग आहे. एक मार्ग कुलंगवरून अलंग आणि मदन याच्या खिंडीतसुद्धा येतो. अलंग गडाची चढाई ही थोडी कठीण आहे. प्रस्तरारोहण करणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रस्तरारोहणाचे साधन सोबत घेणे आवश्यकच आहे. गावातून अलंग आणि मदन यामधील खिंड दिसते. त्या खिंडीतूनच अलंग गडावर जाता येते. गडाचा माथा म्हणजे भले मोठे पठार. या माथ्यावर पोहोचण्यासाठी १५ मी. चा कातळकडा दोर लावून चढावा लागतो. पुढे कातळात खोदलेल्या पायऱ्याही आहेत. एक गुहा आहेत. इथे पूर्वीचा दरवाजा असावा असे वाटते. पण आता तिथे काहीच शिल्लक नाही. गडमाथ्यावर एका कातळात दोन गुहा खोदलेल्या आहेत. यामध्ये राहता येते. गुहेच्या दारात पाण्याचे टाके आहे. पण यात बारमाही पाणी नसते. पठारवरच्या एका टाक्यात बारमाही पाणी असते. या गुहा दुमजलीही आहेत. दुसऱ्या मजल्यावर १६ मी. × १० मी. (५० फूट × ३० फूट) एवढी मोठी गुहा आहे. ताशीव दगडावर गणेशमूर्तीसुद्धा आहे. गुहेच्या वर पठार आहे. या पठारावर कातळात खोदलेली पाण्याची दहा टाकी आहेत. याशिवाय किल्लेदाराचा एक पडका वाडासुध्दा आहे. याला तटबंदीसारखी भिंत आहे. ती भिंत एका बाजूस पूर्णपणे भुईसपाट झाली आहे. या वाड्याच्या जवळच एक पाण्याचे जोड टाकेही आहे. या किल्ल्यावर येण्यास घाटघर आणि उडदवणे येथूनही मार्ग आहेत. गड परिसर बराच मोठा असल्याने फिरायलाही बराच वेळ लागतो. गुहा, टाकी यावरून हे किल्ले यादवपूर्वकालीन असावेत असे वाटते. शिवयुगात या किल्ल्याचा उल्लेख येत नाही. **बादशहानाम्यात** या परिसराचा थोडाफार उल्लेख येतो. सन १८१८ मध्ये कर्नल मॅकडोवेलने आपल्या अधिकाऱ्यांसमवेत याच्या पायऱ्यावर तोफा डागून तेथे सुरुंग पेरून पायऱ्या नष्ट केल्या. आजही पायऱ्यांवर सुरुंग पेरल्याच्या खुणा दिसतात. अलंगची उंची साधारणपणे १,४७० मी. आहे.

**कळसूबाई** (उंची १,६४८ मी.) : प्रवरेच्या खोऱ्यामध्ये जसे किल्ले आहेत तशी शिखरेही आहेत. महाराष्ट्रातील अत्त्युच्च शिखराचा मान कळसूबाईचा आहे. तेही या खोऱ्यातच उभे आहे. कळसूबाई

अनुक्रमणिका

शिखराची उंची १,६४८ मी. आहे. आर्च डीकन गेल याने १८६० साली रात्री प्रवास करून या शिखरावर आरोहण केले. सुप्रभाती त्याने आजूबाजूला पाहिले तेव्हा तो म्हणाला “खरोखर हा दक्षिणेतील पर्वतांचा राजा आहे!” कळसूबाईच्या उत्तरेस बितनगड व दक्षिणेस अलंग, कुलंग हे किल्ले आहेत. याच्या दक्षिणेस पायथ्याशी रतनगड आणि कुलंग इथे प्रवरेचा उगम होतो. कळसूबाईचे शिखर हा सह्याद्रीचा कळस आहे. या कळसूबाईची स्थानिक दंतकथा ऐकण्यासारखी आहे. कळसू ही एका गरीब कोळ्याची मुलगी. तिला रानावनात भटकण्याची फार हौस. एकदा फिरत फिरत ती इंदूर या खेडेगावी आली. हे गाव कळसूबाईच्या पायथ्याशी आहे. येथे एका कोळ्याच्या कुटुंबात ती कामाला राहिली. भांडी घासणार नाही आणि झाडलोट करणार नाही, या अटीवर ती वरकामाला राहिली होती. सुरळीत चालले होते, तो एके दिवशी कोणी तरी तिला भांडी घासायला व केर-कचरा काढायला सांगितले. सांगितलेली कामे आज्ञेप्रमाणे तिने पुरी केली. पण काम होताच तिने हे घर सोडले आणि कळसूबाईच्या पठारावर येऊन राहिली. मरेपर्यंत ती येथेच राहिली. तिने भांडी घासली त्या जागेला ‘थाळमेळ’ व केर काढला या जागेला ‘काळदरा’ अशी नावे आहेत. कळसूबाईला येथील लोक देवीचा अवतार मानू लागले.

या शिखरावर जाण्यासाठी वाट आहे ‘बारी’ गावावरून. हे बारी गाव आहे घोटी-भंडारदरा मार्गावर भंडारदऱ्यापासून १० ते १२ कि.मी. वर. घोटी आणि राजूर, संगमेश्वर येथून बारी गावी पोहोचायला एस.टी आहे. बारीवरून कळसूबाईवर जायला तीन तास लागतात. या वाटेत कठीण ठिकाणी गावकऱ्याच्या परिश्रमाने शिड्या बसविलेल्या आहेत. शिखरावर एक छोटेसे मंदिर आहे. शिखरावरून अलंग, मदन आणि कुलंग, हरिश्चंद्रगड, रतनगड, अवंढा पट्टा, बितनगड असे सर्व किल्ले दिसतात. शिखरावर जाण्यापूर्वी शेवटच्या टप्प्यावर शिडीच्या अगोदर एक पिण्याच्या पाण्याची विहीर आहे.

**कुलंगगड** ( उंची १,४७० मी.) : कुलंगची पायथ्यापासून माथ्यापर्यंतची चढाई ही सह्याद्रीतील किल्ल्यांवरील सर्वात मोठी चढाई. अलंग, मदन आणि कुलंग या दुर्गत्रिकुटामधील सर्वात शेवटचा किल्ला मात्र सर्वात जास्त दमविणारा आहे. कुलंगगडावर जायला घोटीवरून बाहुली गावात जाणारी एसटीची बस आहे. बाहुली गावातून कुरूंगवाडी पायी गाठून किल्ल्यावर जाता येते. याशिवाय आंबेवाडीमार्गे अलंग खिंडीतूनही कुलंगला जाता येते. कुरूंगवाडी मधून जाणारी वाट ही जरी कमी पल्ल्याची असली तरी किल्ल्यावर चढायला ६ तास लागतातच. कुलंग किल्ल्याची उंची साधारणपणे १,४७० मी. आहे.

इंग्रजांच्या किल्ले नष्ट करण्याच्या मोहिमेमुळे कुलंगगडाच्या पायऱ्याही बऱ्याच प्रमाणात फोडून काढल्या आहेत. गडमाथा हा फार मोठा नसून छोटासाच आहे. त्यावर पाण्याची काही टाकी आहेत. यातील पाणी पिण्यायोग्य सुद्धा आहे. याशिवाय किल्ल्यावर राहण्यायोग्य एक गुहा आहे. या गुहेसमोरच पिण्याच्या पाण्याचे टाके आहे. किल्ल्यावरून छोटा कुलंग, मदनचे नेटे, अलंग, रतनगड, कळसूबाई, माहुली असा सर्व परिसर दिसतो.

याशिवाय या परिसरात अवंढापट्टा, बितनगड आणि आडगड असे किल्ले आहेत, पण हे सर्व किल्ले दारणा नदीच्या खोऱ्यात येतात. कलाडगड, कुंजरगड, भैरवगड, पेमगिरी हे हरिश्चंद्रगडाच्या आजूबाजूच्या परिसरातील किल्ले आहेत, जे मुळा नदीच्या खोऱ्यात येतात. अर्थात मुळा नदी ही पुण्याजवळची मुळा नाही, तर ती प्रवरेची उपनदी आहे.

**पाबरगड** (उंची १,२१९ मी.) : भंडारदरा जलाशयाच्या आजूबाजूच्या परिसरात रतनगड, कळसूबाई,

अलंग, मदन आणि कुलंग यासारखे किल्ले आहेत. त्यांच्या सोबतीला भंडारदऱ्याच्या पुढे असणाऱ्या रंधा धबधब्याजवळ एक छोटेखानी किल्ला आहे. त्याचे नाव 'पाबरगड'. भंडारदरा-राजूर-रंधा धबधब्याच्या अलिकडे 'गुहिरे' नावाचे गाव आहे. हेच पाबरगडाच्या पायथ्याचे गाव. पाबरगडाची उंची १,२१९ मी. आहे. प्रवरा नदीच्या खोऱ्यात भंडारदरा जलाशयाच्या एका बाजूला किल्ला उभा आहे. इगतपुरी-भंडारदरा किंवा राजूर आणि संगमेश्वरहून गुहिरे गावात पोहोचता येते. किल्ल्याची एक धार गुहिरे गावात उतरली आहे. तिच्यावरून चढून गेल्यावर गडावर पोहोचण्यास दोन तास लागतात. गडावर शिरण्यासाठी कातळात खोदलेल्या पायऱ्या लागतात. किल्ल्याला छोटासा बालेकिल्ला आहे. त्याच्या खाली सपाटीसारखा भाग आहे. यालाच माची असेही म्हणतात. या परिसरात कारवीचे जंगल मोठ्या प्रमाणावर आहे. सपाटीच्या म्हणजेच माचीसारख्या भागात काही गुहा आहेत. एका गुहेत पाण्याचे टाकेसुध्दा आहे. पाबरगडाच्या बालेकिल्ल्यासारख्या माथ्यावर पोहोचायला पायऱ्या आहेत. माथ्यावर पिण्यायोग्य पाण्याच्या चार टाकी आहेत. भैरोबाचे मंदिर आहे पण त्याला छत नाही. काळ्या कातळाचे भिंतीचे जोते असलेल्या या मंदिरात शेंदूर लावलेला भैरोबाचा तांदळा आहे. गणेशाची मूर्ती ही आहे.

गडाच्या मागील बाजूस काही पाण्याच्या टाकी आहेत. रतनगडाच्या दिशेने गडाचे एक टोक पुढे गेले आहे त्यावरसुध्दा पाण्याचे टाके आहे. याशिवाय गडावर काही खांबयुक्त गुहा आहेत. गडावरून एका बाजूस भंडारदरा जलाशय आणि त्याच्या मागे असणारे रतनगड, अलंग, मदन, कुलंग किल्ले दिसतात. गडावर पूर्ण फेरफटका मारायला एक तास पुरतो. किल्ल्याचा उल्लेख ऐतिहासिक कागदपत्रांमध्ये सापडत नाही पण टेहळणीच्यासाठी नक्कीच किल्ल्याचा उपयोग झाला असावा.

**मदनगड** (उंची १,४७० मी.) : अलंग, मदन आणि कुलंग या दुर्गत्रिकुटामधील दुसरा किल्ला म्हणजे मदनगड. याची उंचीही अलंग एवढी साधारणपणे १,४७० मी. आहे. मात्र याचा घेरा अलंगच्या मानाने फारच कमी आहे. मदनगडाची चढाई ही सुध्दा अलंगसारखीच. कातळावरून करावी लागते. त्यासाठी सुमारे १२ मी. लांबीचा दोर लावणे हे क्रमप्राप्त आहे. मदनला जायला सुध्दा आंबेवाडीमध्ये दाखल व्हायचे आणि अलंग व मदन याच्या खिंडीमध्ये पोहोचायचे. या खिंडीतून उजवीकडे जाणारा रस्ता मदनवर जातो. वाट चांगलीच अडचणीची आहे. १२ मी. भिंत चढून गेल्यावर कातळात खोदलेल्या काही पायऱ्या लागतात. या पायऱ्या चढून गेल्यावर गडमाथा. गडमाथा फारच आटोपशीर आहे. इथे कातळात कोरलेली एक मोठी गुहा आहे. गुहेत उतरण्यास पायऱ्या आहेत. गुहेच्या समोर पाण्याचे टाके आहे, मात्र त्यात फेब्रुवारी पर्यंतच पाणी असते.

या गडाची आणखी एक खासियत म्हणजे कुलंगच्या बाजूला किल्ल्यावर एक मोठे नेटे आहे. हे नेटे दुरुनही ओळखता येते. मदनगडावरून अलंगचा संपूर्ण माथा आणि गुहा परिसर दिसतो.

**रतनगड** (उंची १,२८० मी.) : सह्याद्रीच्या बालेश्वर डोंगररांगेचा एक उपफाटा आहे. त्याचे नाव "घनचक्कर." या घनचक्कर रांगेच्या माथ्यावर रतनगड आहे. या रतनगडजवळच्या डोंगर रांगेमधूनच प्रवरेचा उगम होतो. रतनगड हा नाशिक आणि नगर यांच्या वेशीवर उभा आहे. किल्ल्याच्या पुढ्यातच भंडारदऱ्याचा जलाशय आहे. किल्ल्यावर जाण्यासाठी योग्य वाटा आहेत. एक नगर जिल्ह्यातून तर दुसरी ठाणे जिल्ह्यातून. इगतपुरी-घोटी-भंडारदरा-रतनवाडी हा मार्ग नगर जिल्हाच्या सीमेवरून जातो. ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यात आजोबागडाच्या पायथ्याशी डेणे गाव आहे. ह्या डेण्याहून करोली घाटातूनसुद्धा किल्ल्यावर जाता येते. हा मार्ग लांबचा आहे. भंडारदऱ्याहून रतनवाडीला जाण्यास

गाडीरस्ता तर आहेच, पण भंडारदऱ्याच्या जलाशयात नौकाविहाराची मजाही लुटत रतनवाडीला जाता येते. रतनवाडी हे गडाच्या पायथ्याचे गाव. रतनवाडी गावातील "अमृतेश्वर" हे मंदिर झंज राजाने बांधलेले आहे. या मंदिराच्याच बाजुला पुष्करणी आहे. यालाच "विष्णुतीर्थ" असेही म्हणतात. मंदिराच्या समोरूनच किल्ल्यावर दोन वाटा गेलेल्या आहेत. एका वाटेला शिडीची वाट म्हणतात, तर दुसऱ्या वाटेला नेढ्याची किंवा पायऱ्यांची वाट म्हणतात. ही वाट रतनगडाच्या बाजूला असणाऱ्या खुट्ट्या सुळक्याजवळूनच वर जाते. रतनगडाच्या पहिल्या दरवाजाचे नाव "गणेश दरवाजा" आहे. याच्या तोरणपट्टीवर भैरवाची मूर्ती आहे, तर डावीकडे कातळात गणेशाची मूर्ती आहे. याच्या पुढे आहे त्या दरवाजाचे नाव "हनुमान दरवाजा". याच्याच जवळ कातळात काही गुहा खोदलेल्या आहेत. त्यापैकी छोट्या गुहेत "रत्नादेवीची" तांदळाची मूर्ती आहे. गुहामंदिराच्या पुढे एक मोठी गुहा आहे. त्याच्यासमोर पाण्याचे टाके आहे. हनुमान दरवाजातून पुढे गडाच्या माचीवर वाट जाते. गडाच्या समोर कात्रबाईचा डोंगर, त्यामागे नाफत्याचा डोंगर, त्यामागे हरिश्चंद्रगड असे डोंगर आहेत. इथे कातळात एक अर्धगोलाकृती पाण्याचे टाके खोदलेले आहे. तिथून थोडे परत फिरल्यावर एक वास्तू दिसते, त्याला बुरूजही आहे. यालाच "राणीचा हुडा" असे म्हणतात. हुडाच्या बुरुजाला खेटूनच पाण्याचे एक सुरेख टाके आहे. याच्या वरच्या अंगाससुध्दा गडाच्या पूर्व बाजूवर ३ चौ. मी. चे एक टाके आहे. तिथे कातळाची शिळा आडवी झालेली दिसते. तिथेच एक छोटी नंदीची मूर्ती आणि महादेवाची पिंड कोरलेली आहे. या टाक्यांच्या रूपातच प्रवरा इथे उगम पावते असे गावकरी सांगतात. याच्या दक्षिण दिशेलाही तीन खोदीव टाक्यांचा समूह आहे. याच्या जवळून जाणारी वाट गडाला प्रदक्षिणा घालून जाते.

गडाच्या पश्चिम दिशेला पठार आहे. इथे गवतही भरपूर वाढलेले दिसते. थोड्या अंतरावर एक नागमोडी भिंत आहे. तिथेच अर्ध्या गाडलेल्या अवस्थेतील गडाचे पश्चिम द्वार आहे. यालाच 'कोकण दरवाजा' म्हणतात. ही वाट चढण्या-उतरण्यास फारच कठीण आहे. दरवाजाच्या पुढे पाण्याची दोन आयताकृती आठ-दहा मीटर लांबीची टाकी एकमेकाला समांतर व जवळजवळ त्यांना छेदणारे आणखी एक आडवे टाके आहे. पुढे सहा टाक्यांचा समूह आहे. त्याच्या पुढे अर्धे बुजलेले भुयारी पाणटाके आहे. आणखी ३ मी. × ५ मी. लांबीचे टोक पठारावर आहे. पुढचा रस्ता गडाच्या नेढ्याकडे जातो. गडाचे हे नेढे उत्तराभिमुख असून तिथपर्यंत सहज जाता येते. यातून पलिकडेही उतरता येते. रतनगडाच्या उत्तर भागात एक दरवाजा आहे. गडाच्या माचीवर पूर्व भागात काही पाण्याने तुडुंब भरलेली टाकी आहेत. त्याच्या समोर नंदीची मूर्ती व शिवलिंग कोरलेले आहे. वर एक बुरूजही आहे. इथे खांबटाकेही आढळतात. याशिवाय किल्ल्यावर एके ठिकाणी गाडला गेलेला कोकण दरवाजा दिसतो. या दरवाजाच्या पुढे सहा टाक्यांचा समूह आहे. या टाक्यांच्या जवळच एक जमिनीत अर्धा बुजलेला भुयारा सारखा मार्ग दिसतो. गडाच्या उत्तर दिशेला बालेकिल्ल्याच्या कड्यामध्ये एक नेढे आहे. या नेढ्यातून पलिकडे वाट जाते. तिथे गडाचा "त्रिंबक" नावाचा दरवाजा आहे. हा दरवाजा उत्तराभिमुख आहे. या दरवाजातून खाली उतरण्यासाठी १५० पायऱ्या आहेत. या वाटेने रतनवाडी किंवा साम्रद दोन्ही गावात उतरता येते. रतनगडाची उंची साधारणपणे १,२८० मी. आहे.

पेशवे काळात रतनगडासंबंधीचा उल्लेख आला आहे तो असा-"श्री महादेव रतनगड किल्ल्याखाली आहे. त्यास बाळाजी कराळे यांनी किल्ले रतनगड समयी नवस केला. त्याप्रमाणे रतनगड देविले. सदरहू सामान श्रीच्या गुरूवाजवळ देऊन नित्य नैवेद्य व नंदादीप ताकीद करून चालविणे म्हणून मोरे महादेव यास सनद रतनगडाच्या भौगोलिक स्थानामुळे रागूर व अलंग घाटमाथ्यावरचे अन् सोकुलवाडी व जुरूस्रोशी हे कोकणातले महाल या गडाच्या अधिपत्याखाली होते."

अनुक्रमणिका

इ.स. १७६३ मध्ये जावजी या कोळी सरदाराच्या ताब्यात गड होता. मग कॅप्टन गोडार्डने या किल्ल्यावर १८२० मध्ये ताबा मिळवला, पण तो तिथून गेल्यावर पूर्वीचा किल्लेदार गोविंदराव याने रामजी भांग्रीवाला याला हाताशी धरून परत उठाव केला आणि किल्ला जिंकला.

**रतनवाडी मधील अमृतेश्वर** [अमृतेश्वर मंदिरात महादेवाची पिंड आहे. पिंडीतील लिंग किंवा शाळंुका उचलली की, आत वाहता प्रवाह दिसतो. हाच अमृतकुंभ, हाच अमृतवाहिनी प्रवरेचा उगम.]: रतनवाडी मध्ये महादेवाचे एक मंदिर आहे. त्याचे नाव आहे अमृतेश्वर मंदिर. १२ मी. रूंद, २३ मी. लांब व २२ मी. उंच असे हे मंदिर आहे. अर्धमंडप, मंडप, अंतराळ, गर्भगृह आणि गर्भगृहामागे आणखी एक अर्धमंडप असा मंदिराचा तलविन्यास आहे. मंदिराचा एक आगळावेगळा आणि असाधारण घटक म्हणजे गर्भगृहाच्या मागच्या बाजूला एक अर्धमंडप आहे. मंडपाच्या बाजूच्या भिंतीना बाहेरच्या बाजूप्रत जाणारी अंगे आहेत आणि या अंगाना साध्या सपाट भिंतीऐवजी जालवातायने आहेत. स्तंभ बऱ्यापैकी अलंकृत असून खाली थरयुक्त चौरस तळखडा, त्यावर चौरसाकृती खांब खांबाचा वरचा भाग अष्टकोनी असून त्यावर वर्तुळाकार भाग, त्यावर किचकहस्ताला आधार देणारे वर्तृळाकृती शीर्ष असा स्तंभ घटकक्रम आहे. सभामंडपाच्या दरवाजाऐवजी गाभाराच्या मागील बाजूस दरवाजा आहे. मंदिराचे उभे थरपट्टे आणि कलशासारखा वर्तुळाकार भाग यामधील कोन उत्तम साधला आहे. प्रत्येक बाजूस दोन थरांमध्ये तीन उभ्या पट्ट्यात पंधरा उपशिखरे आहेत. या अर्धशिखरावर नाजूक आडवे कोरीव काम आहे. थरांच्या टोकाला व्यालमुख, तर पायाकडे त्रिदला कमानीमध्ये मूर्ती कोरल्या आहेत. थरपट्ट्याच्या कडेला कंगोऱ्याची नक्षी, तर समोरच्या बाजूवर नाजूक वेलबुट्टी दिसते. मंदिराच्या अंतराळावर पाच उपशिखरे व त्यावर त्रिदल कमान आहे. कमानीच्या दोन्ही बाजूला उपशिखरे आहेत.

मंदिराची सर्वात उल्लेखनीय बाब म्हणजे त्यावर टिकून राहिलेले भूमिज प्रकारचे शिखर होय. शिखरावर चारही बाजूने प्रत्येकी एक अशा एकूण चार लता आहेत. शृंगहाराच्या उभ्या ओळीत प्रत्येकी एक चतुर्थांशात तीन उभ्या ओळी असून ओळीत पाच कूटस्तंभ आहेत. मागच्या बाजूच्या अर्धमंडपाचे शिखर सकृतदर्शनी फांसनाकार असावे असे दिसते. मंदिराच्या समोर नंदी मंडप आहे. मंदिराच्या बाहेरच्या बाजूस फारशा मूर्ती नाहीत. पण द्वारावर सुबक नक्षीकाम आणि कलाकुसर आहे. छताच्या कडेला उत्तम नृत्यशिल्पे, कीर्तिमुखे, अन् समुद्रमंथनाचा देखावा आहे. पश्चिम दरवाजापाशी मिथुन शिल्पे आहेत. ही सर्वच शिल्प अतिशय प्रमाणबध्द कोरलेलीआहेत.

या मंदिराची बांधणी ठाण्याच्या शिलाहार वंशातील झंझ राजाने केली आहे. या झंझ राजाने गोदावरी, भीमा नद्यांच्या परिसरातील सह्याद्रीच्या कुशीत बारा शिवालये बांधली. यामध्ये अमृतेश्वराचा समावेश होतो.

अमृतेश्वर मंदिराच्या समोरच १२ चौ. मी. आकाराची चौकोनी पुष्करणी आहे. या पुष्करणीपासून नैऋत्येला काही अंतरावर अमृतेश्वराचे मंदिर आहे. चौकोनी पुष्करणीच्या कडेच्या भिंतीमध्ये कोनाडे आहेत. प्रत्येकात एकेक मूर्ती आहे. यात प्रामुख्याने गणेश, शेषशायी विष्णू यांचा समावेश आहे. या पुष्करणीमध्ये उतरण्यासाठी दोन बाजूंनी पायऱ्यांची व्यवस्था केलेली आहे. एवढेच नाही, तर या पुष्करणीच्या आजूबाजूच्या परिसरात काही वीरगळ आणि सतीच्या शिलाही पडलेल्या आहेत.

**हरिश्चंद्रगड** (उंची १,४२४ मी.) : पुणे, ठाणे आणि नगर जिल्हे जिथे एकत्र मिळतात त्या नाकाडापासून सह्यपर्वताची ‘बालाघाट’ रांग सुरू होते. ही पूर्वेकडे पसरलेली आहे. या रांगेत प्रवरा व मुळा नद्यांची खोरी

अनुक्रमणिका

आहेत. नगर जिल्ह्यातील अकोले तालुक्याच्या नैऋत्येस ३० कि.मी. पठारावर साधारणपणे १५ चौरस कि.मी. घेराचा हरिश्चंद्रगड पसरलेला आहे. या डोंगराळ भागाला 'डांग' असे म्हणतात. अर्थात नाशिक-गुजराथच्या सीमेजवळचा डांग प्रदेश वेगळा. या भागात महादेव कोळी, ठाकर आणि भिल्ल लोकांची वस्ती आहे. या डांगी प्रदेशाचा घेरा साधारणपणे ६००चौ.मी. आहे. इथे पर्जन्यमानात फारच तफावत आहे. डोंगरमाथ्यावर ६०० सें.मी. पाऊस पडतो, तर पायथ्याशी ८० सें.मी. पडतो. अकोले, राजूर भागात तर वार्षिक पर्जन्यमान अवघे ६० सें.मी. आहे. हा गड साधारणपणे पाचव्या किंवा सहाव्या शतकातील त्रैकूटक अगर कलचुरी या राजघराण्याच्या कारकिर्दीपासून असावा. गडाची उंची १,४२४ मी. आहे. हरिश्चंद्रगडावर तिन्ही जिल्ह्यातून चढाई करता येते.

पुण्याहून अथवा मुंबईहून माळशेज घाट पार केल्यावर खुनी नावाचे गाव आहे. या गावातून धरणाच्या बांधावरून ६ कि.मी. अंतरवर खिरेश्वर गाव लागते. या खिरेश्वर गावात यादवकालीन मंदिर आहे. त्या मंदिराच्या जवळच खडकात खोदलेले लेणे आहे. एक तळे आहे. मंदिर फार लहान आहे. गर्भगृहाच्या द्वाराच्या माथ्यावर शेषशायी विष्णूचे सुंदर शिल्प आहे. बाहेरच्या मंडपाच्या छताला १६ शिल्पपट आहेत. शिल्पपटात गणेश, शिवपार्वती अशी अनेक शिल्पे आहेत. या खिरेश्वरवरून गडावर जायला दोन वाटा आहेत. एक नागेश्वर मंदिराच्या मागे असणाऱ्या डोंगराच्या नेढ्याच्या उजवीकडून नाळेसारख्या भागातून बालेकिल्ल्यावर जाते. वाट अडचणीची आहे. माहितगाराशिवाय जाऊ नये. दुसरी वाट ही रुळलेली आहे. ती टोलार खिंडीतून गडावर जाते. या वाटेने गडावर जातांना बरेच डोंगर पार करावे लागतात. पहिल्या वाटेला राजदरवाजाची वाट म्हणतात तर दुसऱ्याला टोलारखिंडीची. टोलारखिंडीतच नगर आणि पुणे जिल्ह्याच्या सीमा एकत्र येतात. येथे वाघाचे एक दगडी शिल्पही आहे. तिसरी वाट पाचनईची वाट. नगर जिल्ह्यातून घोटी-संगमनेर-राजूर मार्गे पाचनईला यायचे आणि तिथून सोप्या वाटेने किल्ल्यावर जाता येते. हल्ली राजूर-टोलारखिंड असाही मार्ग झाला आहे. ठाणे जिल्ह्यातून मुरबाड-बेलपाडा, साघले घाटमार्गे गडावर एक वाट जात. वाट कठीण आहे. याशिवाय नळीची एक वाटसुद्धा आहे. ती खूप अवघड आहे.

हरिश्चंद्रगडाचे दोन बालेकिल्ले आहेत. एक रोहीदास व दुसरा तारामती. यातील तारामती बालेकिल्ल्याच्या सर्वोच्च माथ्यावर लेणी आहेत. ही लेणी खूपच सामान्य प्रकारची आहेत. साधारण दहाव्या व अकराव्या शतकात ही लेणी खोदलेली असावीत. यातील १ क्र. गुहा ५ मी. रुंद आहे. गुहेच्या द्वारावर गणेशपट्टी आहे. ३ क्र. गुहेत एका भिंतीवर २ मी. उंचीची सुबक अशी गणेशमूर्ती आहे. शिखराच्या पायथ्याशी थोड्या सपाटीवर आणखी दोन लेणी आहेत. एक हरिश्चंद्रेश्वर लेणे व दुसरे केदारेश्वर लेणे. हरिश्चंद्रेश्वर लेण्याच्या प्राकारात खोलगट भागात हरिश्चंद्रेश्वराचे हेमाडपंती मंदिर आहे. या प्राकाराच्या प्रवेशद्वारासमोरून एक ओढा पाचनईकडे वाहतो. या ओढ्यालाच मंगळगंगा असे चांगदेवांनी संबोधिले आहे. हरिश्चंद्रेश्वराचे मंदिर साधारण १५ मी. उंचीचे आहे. आत शिवलिंग आहे. त्याला पूर्वी आत जाण्यास चारही बाजूंनी दरवाजे असावेत, पण सध्या दोनच दिसतात. पश्चिमेकडील दरवाजापाशी द्वारपालांच्या मोठ्या मूर्ती व नंदी आहेत. मंदिरास फक्त गर्भगृह आहे. मंदिराच्या मागे प्राकारात तीन गुहावजा खोल्या आहेत. प्रत्येक गुहेच्या मध्ये जमिनीत पाण्याचे टाके आहे. एका लेण्यात देवीचे शिल्प आहे. एकात विठ्ठल रखुमाईच्या मूर्ती आहेत. प्राकाराच्या उजव्या कोपऱ्यात छोटेसे गणेशमंदिर आहे. मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ ४ डावीकडे, १ उजवीकडे ओवऱ्या आहेत. सर्वात मोठी क्र. २ ची ओवरी आहे. त्याची लांबी ७ मी. व रुंदी २ मी. रुंद आहे. येथे ४ सें.मी. उंचीची किर्तीमुखे आहेत. मंदिराच्या या प्राकारातील गुहा योग्यांची राहण्याची ठिकाणे असावीत. या गुहांमध्ये आणि त्यांच्या भिंतींवर काही शिलालेख आहेत. या

अनुक्रमणिका

लेखांमध्ये चांगदेवाचे नाव आहे. चांगावटेश्वर हे हरिश्चंद्रगडावर आपल्या शिष्यांसह राहत होते आणि तेथेच त्यांनी 'तत्वसार' ग्रंथाची निर्मिती केली असे मानले जाते.

मंदिराच्या थोडेसे पूर्वेकडे सप्ततीर्थ नावाची हेमाडपंती बारव आहे. या बारवेच्या दक्षिणेकडील बाजूच्या देवळांमध्ये चौदा विष्णूमूर्ती होत्या. सध्या त्या मंदिराच्या मागे असणाऱ्या एका गुहेत ठेवल्या आहेत. यातील बऱ्याचशा मूर्ती चतुर्भूज आहेत. मंदिर आणि सप्ततीर्थ कुंडाच्या आजूबाजूला अनेक मूर्ती, लिंग, शाळुंका पडलेल्या दिसतात. त्यावरून हे शैव उपासकाचे स्थान असावे हे स्पष्ट दिसते. मंदिराच्या खालच्या बाजूस मंगळगंगेच्या काठावर काही लेणी आहेत. त्यापैकी केदारेश्वराचे लेणे सर्वात मोठे आहे. याची लांबी-रूंदी साधारणपणे १६ मी. आहे. हे लेणे चार खांबानी तोललेले दिसते. यापैकी तीन पडून गेले आहेत. याबद्दल गावकरी आख्यायिका सांगतात ती अशी-"हे चार खांब म्हणजे चार युगांचे प्रतीक सत्य, त्रेता, व्दापार आणि कलियुग होय. यापैकी तीन युगे संपली आणि चौथे कलियुग चालू आहे. त्यामुळेच तीन खांब पडलेले आहेत आणि सध्या कलियुग चालू असल्याने एकच खांब शिल्लक आहे." या खांबांच्या बरोबर मधोमध १.८ मी. उंच असे शिवलिंग आहे. संपूर्ण लेण्यात पाणी आहे. एका भिंतीवर शिवपूजनाचा शिल्पपटही खोदलेला आहे. या लेण्याच्या दर्शनी भागाच्या खांबांवरही शिलालेख आहेत.

या गडाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे अर्धा किलोमीटर परिघाचा अर्धवर्तुळाकृती अंतर्वक्र असा काळाकभिन्न रौद्रभीषण कोकणकडा. हा कोकणकडा गडाच्या पश्चिम बाजूस आहे. याच्या पायथ्याला ठाणे जिल्हा म्हणजे कोकण. त्यामुळे त्याला कोकणकडा असे म्हणतात. कड्याची उंची साधारणपणे १,३७१ मी. आहे. १८३५ सालच्या मे महिन्यात कर्नल साइक्स हा याच कोकण कड्यावर आला होता. हरिश्चंद्रगडाच्या परिसरात शुष्क पानझडी पासून सदाहरित प्रकारची झाडे आढळतात. रानभेंड, मोह, साग, ऐन, पळस आणि सावर या प्रकारची झाडे गडावर आढळतात. गड आणि आसपासच्या परिसरात स्पॉटेड बॅबलर, स्वाकी, गरूड, ससाणे, भारद्वाज, सातभाई, चंडोल, मुनिया, स्पर फाऊल, पावशा आणि चातक या प्रकारचे पक्षीसुध्दा आढळतात. हरिश्चंद्रगडावरील लेण्यात किंवा गुहेत शिलालेख असल्याचा उल्लेख डब्ल्यू एफ. सिक्लेर यांनी केला होता. या शिलालेखांचा संपूर्ण अभ्यास डॉ. वि. भि. कोलते यांनी केला. त्यांच्या 'महाराष्ट्रातील काही ताम्रपट आणि शिलालेख' या पुस्तकात उल्लेख केला आहे. पहिला लेख मंदिराच्या भवती असलेल्या प्राकाराच्या प्रवेशद्वारात शिरण्यापूर्वी डाव्या हाताला कोरलेला आहे. त्याचे "चंद्रपाणी वटेश्वर नंदनु तस्य सुतु वीकटदेओ" असे वाचन आहे. दुसरा लेख केदारेश्वर गुहेच्या खांबावर कोरलेला आहे. तिसरा लेखसुद्धा याच लेण्याच्या खांबावर आहे. मंदिराच्या मागील लेण्याच्या दर्शनी खांबावरसुद्धा लेख आहे. याचे वाचन "चांगा वटेश्वराचा" असे आहे. याशिवाय लेण्याच्या खांबावर आणखी ४ लेख आढळतात. या लेखांमधून वेगवेगळ्या व्यक्तींची नावे आलेली दिसतात.

***

अनुक्रमणिका

## संदर्भ


[१] पाठक, अ. शं. (संपा.), **महाराष्ट्र प्राचीन काळ (खंड १, भाग २) स्थापत्य व कला,** दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, २००८, पृ. १४३-१४५.

[२] सांकलिया' ह. धी., **महाराष्ट्रातील पुरातत्त्व,** महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९७६, पृ. ११७-११८.

[३] माटे, म. श्री., **मराठे वास्तूशिल्प (१६५० ते १८५०),** कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे, २००८ (प्रथम आवृत्ती), पृ. १२४.

[४] माटे, म. श्री., उपरोक्त, पृ. १२५.

[५] देव, शां.भा., **महाराष्ट्र व गोवे शिलालेख-ताम्रपटांची वर्णनात्मक संदर्भ सूची,** महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, १९८२.

[६] अहमदनगर डिस्ट्रीक्ट गॅझेटिअर (रिवाइजड् एडिशन), गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र, मुंबई, १९७६, पृ. ९१४.

[७] देव, शां. भा., उपरोक्त, पृ. ९७.

[८] कित्ता, पृ. १९४.

[९] ठोसर, हरिहर, **हिस्टॉरिकल जॉग्राफी ऑफ महाराष्ट्र ॲण्ड गोवा,** दि एपिग्राफिकल सोसायटी ऑफ इंडिया, म्हैसूर, २००४, पृ. ५७५.

[१०] देव, शां. भा., पूर्वोक्त पृ. ३३८.

[११] ठोसर, हरिहर, उपरोक्त.

[१२] देव, शां. भा., उपरोक्त. पृ. ४६.

[१३] ठोसर, हरिहर, उपरोक्त.


***

अनुक्रमणिका